महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

गोंदिया जिल्हा पोलीस वार्तापत्र

दिनांक-२३/०७/२०१८

**१) पो.स्टे.गोरेगांवः- दुखापत**

दिनांक २१/०७/२०१८ चे २०.३० वा. सुमारास मौजा घुमर्रा येथे, फिर्यादी हेतराम देवराम पटले वय ४३ वर्षे रा.घुमर्रा याने ३८ वर्षीय आरोपीस क्षुल्लक अशा कारणावरुन हटकले असता आरोपीने फिर्यादीसोबत भांडण करुन लोखंडी हत्याराने गळयावर व डाव्या हातावर मारुन जखमी केल्याने फिर्यादीच्या तक्रारीवरुन व वैद्यकीय अहवालवरुन पो.स्टे.गोरेगाव येथे अप.क्र.१६३/२०१८ कलम ३२४ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोहवा गणविर पो.स्टे.गोरेगांव करीत आहे.

**२) पो.स्टे.गोंदिया शहरः- दुखापत**

दिनांक २२/०७/२०१८ चे १७.३० वा. सुमारास मुर्री चौक गोंदिया येथे, ३६ वर्षीय आरोपीने आपल्या पत्नीसोबत क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी संजय मिठाईलाल कैथवास वय ३४ वर्षे रा.गौतम नगर यांचे तक्रारीवरुन व वैद्यकीय अहवालवरुन पो.स्टे.गोंदिया शहर येथे अप.क्र.३३५/२०१८ कलम ३२४ भांदवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोहवा.आडे पो.स्टे.गोंदिया शहर करीत आहे.

**३) पो.स्टे.चिचगड :- विनयभंग**

दिनांक २२/०७/२०१८ चे ११.०० वा.ते ११.१५ वा. दरम्यान मौजा कडीकसा जगंल परिसर येथे, २९ वर्षीय महिला फिर्यादी ही आपले शेतालगत जगंलामध्ये शेळया चारत असता ३० वर्षीय आरोपीने जवळ जावुन अश्लिल शब्दाचा वापर करुन हात पकडुन विनयभंग करुन जर कुणाला सांगीतले तर तुझ्या परिवारास जिवे ठार मारीन अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे तक्रारीवरुन पो.स्टे. चिचगड येथे अप.क्र.७६/२०१८ कलम ३५४,५०६ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास सफौ सव्वालाखे पो.स्टे.चिचगड करीत आहे.

२३/७

**(राजु बन्सी मेढे )**
पोलिस निरीक्षक
जिल्हा विशेष शाखा,गोंदिया